जिल्हा परिषदांतील रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या संदर्भात अनुसरण्याची कार्यपध्दती.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः न्यायाप्र २५१७/प्रक्र-१४८(भाग-२)/आस्था-१०,
बांधकाम भवन,२५,मर्झबान पथ,
फोर्ट,मुंबई-४०० ०३२.
तारीख: ०६ मार्च,२०१९.

<u>वाचा</u>

१) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम,१९६१,
२) शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग,क्रमांक-रुअआ-१५९६/२२८/सेवा-५, दि.२४ एप्रिल,२००१.

प्रस्तावना :- राज्यातील जिल्हा परिषदांमधील बांधकाम विभाग व लघुपाटबंधारे विभागामध्ये काम करणाऱ्या रोजंदारी कर्मचाऱ्यांना कालेलकर करारानुसार रुपांतरीत नियमित अस्थायी आस्थापनेवर घेण्यात येते. तथापि, ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील रोजंदारी कर्मचाऱ्यांना कालेलकर करार लागू नाही. यासंदर्भात काही जिल्हा परिषदांतील ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील रोजंदारी कर्मचाऱ्यांना कालेलकर कराराचे फायदे देण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने आदेश पारित केले आहेत. हे आदेश विचारात घेवून रोजंदारी तत्त्वावरील नियुक्त्या करण्यासंदर्भात पुढीलप्रमाणे शासन निर्णय घेत आहे:-

<u>शासन निर्णय</u>

१. जिल्हा परिषदांमध्ये यापुढे कोणत्याही कामासाठी कोणत्याही परिस्थितीत रोजंदारी तत्त्वावर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येवू नये. मात्र, रोजंदारी तत्त्वावर कर्मचारी नियुक्त करणे आवश्यक आहे अशा प्रकरणांत त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावा. शासनाच्या मान्यतेनंतरच रोजंदारी तत्त्वावर कर्मचारी नियुक्त करावेत.

२. सद्यस्थितीत रोजंदारी तत्त्वावर कार्यरत कर्मचाऱ्यांसंदर्भात तात्काळ आढावा घेण्यात यावा

३. रोजंदारी तत्त्वावर नियुक्त कर्मचाऱ्यांबाबत कामाचे स्वरुप काय आहे (तात्पुरते किंवा कायमस्वरुपी तसेच पूर्णवेळ/अंशकालीन) हे तपासावे. या कामासाठी किती कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे हे तपासावे.

४. कामाचे स्वरुप कायमस्वरुपी असल्यास त्यासाठी पदांची संख्या निश्चित करण्यात येवून विहित पध्दतीनुसार पदनिर्मितिचा प्रस्ताव शासनास सादर करावा. अशा प्रस्तावास शासनाची मान्यता मिळाल्याशिवाय त्या पदांवर नियुक्ती देण्यात येवू नये.

५. कामाचे स्वरुप तात्पुरते/अशंकालीन (part time) असल्यास अशी कामे बाह्य यंत्रणेव्दारे (out sourcing) करण्यात यावीत.

६. बाह्य यंत्रणेची नियुक्ती करतांना या संदर्भात वित्त विभाग व सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

७. जिल्हा परिषदांच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाअंतर्गत कार्यरत रोजंदारी कर्मचाऱ्यांना कालेलकर करारानुसार अस्थायी आस्थापनेवर घेण्याबाबत मा.न्यायालयाने आदेश दिले असल्यास अशा प्रकरणी दि.२४.४.२००१ च्या शासन निर्णयातील कालावधी विचारात न घेता न्यायालयाच्या आदेशात अंतर्भूत असलेल्या सर्व कर्मच्याऱ्यांना संबंधित जिल्हा परिषदेने त्यांच्या स्तरावरुन अस्थायी आस्थापनेवर घेण्याबाबतचा निर्णय घ्यावा व तसे आदेश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्गमित करावेत. असा निर्णय घेतांना शासन निर्णय,सार्वजनिक बांधकाम विभाग,क्र.रुअआ-१५९६/२२८/सेवा-५, दि.२४ एप्रिल २००१ मधील अन्य अटी शर्तींचे पालन करावे. या कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे वेतन व भत्ते हे संपूर्णपणे जिल्हा परिषदेच्या स्वनिधीमधून देण्यात यावेत. त्यासाठी शासन स्तरावरुन कोणतेही अनुदान / निधी उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

यापुढे सर्व जिल्हा परिषदांनी उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०६१७३०३२२२२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Ravindra Ishwar Giri
Date: 2019.03.07 14:37:04 +05'30'

(र.ई.गिरी)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,१) अतिरिक्त मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
२) प्रधान सचिव,वित्त विभाग,
३) प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,
४) सर्व विभागीय आयुक्त,
५) मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व),
६) सर्व कक्ष अधिकारी/अवर सचिव/उप सचिव/सह सचिव ग्राम विकास विभाग,मंत्रालय मुंबई.
७) निवड नस्ती आस्था-१०.